महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्र. मासं/रवका/न.क्र.५/ १९३९२
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
**दिनांक - २१.०७.२०२२**

# परिपत्रक

**विषय:** स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत **"हर घर तिरंगा"** उपक्रम राबविण्याबाबत.

**संदर्भ:** परिपत्रक क्र. १८६४४ दि. १४.०७.२०२२

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या गौरवशाली पर्वानिमित्त दि. १२ मार्च २०२१ ते दि. १५ ऑगस्ट २०२३ या कालावधीत "आजादी का अमृत महोत्सव" या उपक्रमाचे आयोजन करण्याबाबत केंद्र शासनाने कळविले आहे. त्याअनुषंगाने, महाराष्ट्र शासन, परिपत्रक क्र.संकीर्ण ८२२२/प्र.क्र.११०(भाग-२)/सां.का.४ दि.२०.०६.२०२२ व परिपत्रक क्र.संकीर्ण ८२२२/प्र.क्र.११० (भाग-२)/सां.का.४ दि.३०.०६.२०२२ अन्वये स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत उपक्रम राबविण्याबाबत च्या सुचना पारित केलेल्या आहेत, सदर सुचनाच्या अनुषंगाने महावितरण कंपनी अंतर्गत **"हर घर तिरंगा"** उपक्रम राबविण्याकरीता कंपनीचे संदर्भिय परिपत्रकान्वये सुचना यापुर्वीच निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२. त्या अनुषंगाने मा. प्रधान सचिव (ऊर्जा) यांनी घेतलेल्या दि. २१.०७.२०२२ रोजीच्या बैठकीत, महाराष्ट्र शासन, परिपत्रक दि.२०.०६.२०२२ व दि.३०.०६.२०२२ अन्वये स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत **"हर घर तिरंगा"** उपक्रम राबविण्याबाबतच्या अतिरिक्त सुचनांच्या अनुषंगाने महावितरण कंपनी अंतर्गत सदर उपक्रमाची यशस्वीपणे अंमलबजावणी करण्याकरीता खालीलप्रमाणे सविस्तर मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

क) दि. १३ ऑगस्ट २०२२ ते दि. १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत कंपनीचे सांघिक कार्यालय, सर्व क्षेत्रिय कार्यालये व उपकेंद्रावर तिरंगा ध्वज फडकवावा.

ख) तिरंगा ध्वज केंद्र सरकारकडून उपलब्ध करून दिला जाईल. परंतु, काठी (stick) दिली जाणार नाही. तिरंगा ध्वज विभागीय आयुक्त यांच्या कार्यालया मध्ये उपलब्ध असेल, सदर तिरंगा ध्वजाची मागणी प्रत्येक जिल्हातील निवासी उप जिल्हाधिकारी यांच्याकडे नोंदवावी.

ग) अतिरिक्त तिरंगा ध्वज मागणी असल्यास सदर तिरंगा ग्रामीण विकास विभागाकडून पुरवल्या जाणाऱ्या पुरवठादाराच्या यादीत नमुद पुरवठादाराकडून खरेदी करावी.

घ) याबाबत आवश्यक जनजागृती मोहीम राबवुन त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

च) IEC साहित्य http://mahaamrut.org या वेवसाईटवर उपलब्ध आहे. तसेच सदर उपक्रमाची छांयाचित्रे या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात यावेत.

छ) तिरंगा ध्वज ऊर्जा विभागाच्या अधिनस्त येणाऱ्या महावितरण कंपनीतील सर्व क्षेत्रिय कार्यालय, शाखा कार्यालय व उपकेंद्रांवर फडकवावा.

ज) सर्व कार्यालयांनी दि. १३ ऑगस्ट २०२२ ते दि. १५ ऑगस्ट २०२२ पर्यंत ध्वज फडकवण्याकरीता आवश्यक असणाऱ्या संहितेचे (Flag Code for Tiranga) पालन करावे.

झ) **"हर घर तिरंगा"** उपक्रमाचे संकेत चिन्ह / फलक हे कंपनीअंतर्गत सर्व कार्यालयांवर व कंपनीच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात यावीत.

ट) दि. १३ ऑगस्ट २०२२ ते दि. १५ ऑगस्ट २०२२ पर्यंत सर्व कार्यालये, उपकेंद्रे इत्यादींनी तिरंग्यासाठी ध्वज संहितेचे काटेकोरपणे पालन करावे.

३. सबब, सांघिक कार्यालय व सर्व क्षेत्रिय कार्यालयांमधील संबंधित अधिकारी यांनी उपरोक्त मार्गदर्शक सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी होईल याची दक्षता घ्यावी.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**(अमि.भादीकर)**
**कार्यकारी संचालक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (संचलन)/ (वित्त)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.
२) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.
३) कार्यकारी संचालक (सुवअं)/ (वित्त)/ (महसूल व देयके) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ (सांघिक वित्त)/ (अंतर्गत लेखा परिक्षण) / (सांघिक लेखा) / (माहिती तंत्रज्ञान) / मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)
५) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासंव्यप्र)/ (नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
६) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
७) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.